महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
अतिउच्चदाब(संवसु) विभाग,सोलापूर.
सीआयएन नं.यु ४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४६

ऑफीसचे नांव : कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,म.रा.वि.पारेषण कंपनी, मर्यादित,
ऑफीसचा पत्ता: प्रशासकीय इमारत २२० के.व्ही. बाळे उपकेंद्र आवार बार्शीरोड अंबिकानगर
बाळे, सोलापूर.४१३२५५.(महाराष्ट्र)
संपर्क नं .(दूरध्वनी). ☎०२१७ (वै) २३५०६७३
Email Address: ee6210@mahatransco.in
Website: wwwmahatransco.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र:- काअ/अऊदा/(संवसु)/ वि/सोला./मासं/ - 1572 दिनांक: 4 NOV 2022

## जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, सोलापूर अंतर्गत आय.टी.आय.वीजतंत्री शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे याकरिता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पात्र विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी दि.०७.११.२०२२ ते २०.११.२०२२ पर्यंत रात्री २३:५९ वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर खाली नमूद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज करावे.

| कार्यालयाचे नांव | आस्थापनेचा नोंदणी (Registration) क्र. | ट्रेड | एकूण जागा |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, सोलापूर. म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित सोलापूर. | E09162700771<br>Opportunity Code.AO283657 | वीजतंत्री<br>( Electrician ) | ६३ |

(टिप:- उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरते वेळी **Opportunity Code** वरीलप्रमाणे असल्याची खात्री करावी).

१. उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार सोलापूर जिल्हातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

२. **शैक्षणिक अर्हता:-**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे
२.राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. **शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे** (लागू असल्याप्रमाणे):-

१.एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र.
२. आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका (चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची प्रत).
३.शाळा सोडल्याचा दाखला.
४.आधार कार्ड ( आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नांव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नांवाशी सुसंगत असावे तसेच आधारकार्ड आपल्या प्रोफाईल (Profile) शी लिंक असणे आवश्यक आहे.)
५.मागास वर्गात समाविष्ठ असल्यास जात प्रमाणपत्र.
६.महाराष्ट्र राज्याचे रहिवासी (Domicile) प्रमाणपत्र.
७.प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र-नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अजा व अज प्रवर्गातील उमेदवार वगळून).
८.आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र व इतर सर्व आवश्यक कागदपत्रांची मुळ प्रत उमेदवा-यांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून आपलोड करावे.

४. **विद्यावेतन:-**

विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

५. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक राहणार नाही.

६. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास, वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल / अपात्र ठरविण्यात येईल.

७. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (चार ही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे. या बाबत अंतिम तारखेनंतर कोणतीही तक्रार ऐंकून घेतली जाणार नाही.

८. **शिकाऊ उमेदवारानी ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना पोर्टलवर फोटो, मुळप्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळप्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी तसेच अपूर्ण, चूकीचे व अपुऱ्या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

९. शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. मार्क, आयटीआय मार्क , ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

१०. शिकाऊ उमेदवारांची निवड ही, एसएससी व आयटीआय परीक्षेचे मिळून एकूण प्राप्त गुणांच्या ५० टक्के सरासरीच्या आधारे गुणवत्ते यादीनुसार होईल. मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राह्य धरण्यात येणार नाही तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहूण खालील प्रमाणे प्रवर्गनिहाय केली जाईल.

| अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ. ३% | भ.ज.ब. २.५% | भ.ज.क. ३.५% | भ.ज.ड. २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | आर्थिक दृष्टया दुर्बल १०% | अराखीव ३८% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | २ | २ | २ | १ | १ | १२ | ६ | २४ |

११. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१२. वयोमर्यादा १८ ते ३८ वय वर्षे (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम).

१३. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवारानं सद्यस्थितीत कार्यान्वित असणारा E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वियत नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१४. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१५. ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज / शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ई-मेलद्वारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल.

१६. **प्रणालीमध्ये बदल झाल्यामुळे या आदी ज्या उमेदवारांनी वरील किंवा याच अस्थापनेच्या इतर अस्थापन नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रक्रिये करता फक्त दि.०७.११.२०२२ ते २०.११.२०२२ पर्यंत केलेल्या अर्जाचां विचार केला जाईल वर नमूद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवरांचा भरती / निवड प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐंकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

१७. सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके , नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

आपला विश्वासू

कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,सोलापूर.

**प्रत सविनय सादर:-**
अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, सोलापूर.
**प्रत सस्नेह रवाना :-**
मा.प्राचार्य,औद्योगीक प्रशिक्षण संस्था,बी.टी.आर.अधिकारी,
विजापूर रोड सोलापूर.